# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 04/11/2022 (शुक्रवार) सायंकाळ

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. अरोली :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील धर्मापूरी येथे दिनांक ०३/११/२०२२ चे दूपारी १२.०० ते १२.१५ वा दरम्यान वा. सुमारास फिर्यादी नामे— फैजल इसराईल, शेख वय २७ वर्षे, रा कोदामेंढी याला त्याची पत्नी नामे— अनिश खलील शेख हिचा फोन आला की, फिर्यादीचे वडील व नातेवाईक यांचा धर्मापूरी फाटयावर अपघात झाला आहे असे माहीती पडताच फिर्यादी हे धर्मापूरी फाटयावर गेले तेथे आटो क्र एम एच ३६/एफ—८१५८ हा पलटलेल्या स्थितीत दिसुन आला तेथे फिर्यादीचे सासरे नामे— १) खलील शेख २) नजीर पठाण ३) गुलनाज खलील शेख ४) अप्सा परवेज शेख, सर्व रा भंडारा ५) शाहरूख शेख, रा. नागपूर हे जखमी अवस्थेत रोडच्या बाजूला होते तेथे बाजूला असलेल्या नाल्यामध्ये ट्रॅक्टर डी—३१/ ९१०१ रेती भरलेला पलटलेल्या स्थितीत होता ट्रॅक्टरचा चालक हा कोणत्याही प्रकारची मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला होता. फिर्यादीने तसेच हजर असलेल्या लोकांनी जखमींना उपचार कामी खाजगी वाहनाने जिल्हा रूग्णालय, भंडारा येथे घेवून गेले तसेच तेथे उपचारादरम्यान फिर्यादीची साळी नामे—अप्सा परवेज शेख, वय ५ वर्षे ही मरण पावली. बाकि जखमींचा जिल्हा रूग्णालय, भंडारा येथे उपचार सुरू आहे.

फिर्यादीचे सासरे व नातेवाईक कोदामेंढी येथे जेवण करण्याकरीता येत असता धर्मापूरी फाटयावर ३६/ एफ—८१५८ भंडा—यावरून कोदामेंढी फिर्यादीचे घरी येत असता धर्मापरी फाटयावर ट्रॅक्टर क्र. डी ३१/ ९१०१ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवल्याने फिर्यादीचे साळी अप्सा परवेज शेख हिच्या मरणास व नातेवाईकास गंभीर जखमी करण्यास कारणीभुत ठरला

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४अ, १८४, १३४, १७७ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन अरोली करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**